मौलकविचारमाला - १७

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

पराभक्ती विचार

भक्तीचे १६ प्रकार

रु. ५

- डॉ.कृ.मा.घटाटे

(२)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात

(३)

'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.

(४)

* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.

* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* ''तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून

प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * १७ आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व व्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०,
* श्लोक – १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००

भक्तीचे सोळा प्रकार

भक्तिवाङ्मयामध्ये अनेक पद्धतींनी भक्तीचे निरूपण केलेले आढळते. *गीतेमध्ये आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे भक्तांचे ४ प्रकार आहेत; *कुठे नवविधाभक्ती; *कुठे लालन, वात्सल्य, माधुर्य, *तर कुठे गौणी व परा, वगैरे पद्धतींनी भक्तीचे स्वरूप सांगितलें जाते. या सर्व प्रकारांना एकत्र करून, त्यांची उत्तरोत्तर संगती लावून भक्तीची व्यवस्था समजावून घ्यावयाची असेल तर श्रीगुलाबराव महाराजांनी गोविंदानंदसुधा, प्रीतिनर्तन आणि भगवद्-भक्तिसौरभ या ग्रंथांतून केलेले विवेचन समजून घ्यावे लागेल.

महाराजांनी निष्काम भक्तीचे गौणी, मध्यमा आणि परा, असे मुख्य तीन प्रकार

करून त्यांचेही एकूण सोळा प्रकारात विभाजन केलेआहे.

गौणभक्तीत नवविधा भक्तीतील नववे आत्मनिवेदन सोडून आठ प्रकार समाविष्ट होतात. गोविंदानंदसुधेत -

श्रवणं, कीर्तनं, विष्णोः स्मरणं, पादसेवनम् ।
EYÇÆeÄæ¢Æet çÊ®æl P®æT çmy®ª É÷‡ç @@3@@

या श्लोकात महाराजांनी गौणी भक्तीचे, म्हणजेच ज्ञानपूर्व भक्तीचे, म्हणजेच उपासनेचे आठ प्रकार दाखविले आहेत. त्या प्रत्येक प्रकारामध्ये आदर्शभूत असे कोण कोण भक्त आहेत त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत.

<u>९ आदर्श भक्त</u>

श्रीकृष्णश्रवणे 'परीक्षिति'रभूत्
'वैय्यासकि' कीर्तने ॥
'प्रह्लाद' स्मरणे,

(९)

तदंघ्रिभजने 'लक्ष्मी',
'पृथुः' पूजने ॥
'अक्रूर'स्तु अभिवन्दने,
'कपिपति'र्दास्ये च
सख्ये 'अर्जुनः'॥
देवस्यात्मनिवेदने 'बलि'रभूत् सर्वस्वसंपूजने ॥

या श्लोकात गौणीभक्तीचे, आदर्श म्हणून जरी परीक्षित, शुक, नारदादींची नांवे आली असली तरी ते गौण-भक्त होते असा त्याचा अर्थ नाही कारण उपासकांना शेवटी सज्ञान पराभक्ती मिळतेच; पण पूर्वी त्यांनी ज्या साधनरूप गौणीभक्तीचा अवलंब केला असतो ती भक्ती नाहीशी होत नाही, ती कायम राहते. महाराज भक्तिपदतीर्थामृतात म्हणतात -

गौणआणि परा । या भेदासी नाही थारा ।
अवघी एकाकारा । प्रेमलक्षणा ॥[२०]

(१०)

एकदा का पराभक्ती प्राप्त झाली की नंतर अन्तःकरणात उठणारे सर्व प्रकारचे प्रेम हे ज्ञानोत्तर परमप्रेमाचेच उन्मेष होतात. त्यात 'गौण-परा' असा भेद नसतो. आत्मज्ञान होईपर्यंतच त्यांना गौण म्हणावयाचे असते. जीवब्रह्मैक्याचा अनुभव आला की नंतर सगुण भगवंतासाठी उठणारी प्रत्येक प्रेमवृत्ती पराभक्तीचीच नवनवोन्मेष असते. म्हणूनच वर वर्णन केलेले भक्त श्रवणादि भक्तीचे आदर्श असूनही ते पराभक्ती प्राप्त झालेले परमभक्तच होत !

<u>अधिकारी व उपास्य</u>

जेव्हा सामान्य माणूस संसारातील दुःखांचा अनुभव घेऊन कधीही नाश न पावणाऱ्या आत्मानंदाची इच्छा करतो तेव्हा तो परमार्थाला अधिकारी होतो.

(११)

संसारदुःखे दुखावला । त्रिविधतापे तापला ।
तोचि अधिकारी जाहला । परमार्थासी ॥

संसारदुःखांनी दुखावलेला, त्रिविधतापांनी तापलेला, तोच परमार्थाचा अधिकारी होय[२१] असे समर्थ रामदासांनी लक्षण केले आहे. विषयसुखात दोष असल्यामुळे संसारात सर्वत्र दुःखच भरले आहे अशी भावना दृढ करून मग गृहसौख्याचा अंतःकरणातून त्याग करावा व संतांच्या सेवेस लागावे. म्हणजे मग 'सत्पुरुष हे गुरुरूपाने अवतीर्ण झालेले परब्रह्मच होय' असा अनुभव येतो. हा अनुभव मनात पक्का बिंबवून सगुण भगवंताची किंवा श्रीगुरूंची सेवा करावयाची असते.

अशावेळी परोक्षरूपाने श्रीकृष्णादि विग्रह असतात तर अपरोक्षरूपाने भगवान श्रीगुरु असतात. यापैकी भगवंताची किंवा श्रीगुरूंची

(१२)

कोणाचीही प्रेमपूर्वक सेवा केली तरी ती भक्तीच म्हटली जाते. तिचे महाराजांनी सोळा प्रकार केले आहेत.

<u>(१) श्रवण</u>

इतिहासपुराणादिकांत वर्णन केलेल्या भगवत्कथा किंवा भक्तांच्या कथा गुरुमुखाने श्रवण कराव्या. तदनुसार ध्यान करावे. पुराणादिकांत वर्णिलेले गुण आपल्या उपास्यमूर्तीच्या ठिकाणी स्थापन करावे म्हणजे ते सर्व गुण आणि अवतार लीला आपल्या उपास्य विग्रहानेच केल्या आहेत अशी भावना दृढ करावी. या भावनेसोबत सगुण भगवंताच्या लीला श्रवण करणे आणि वेदांत श्रवण करणे ही श्रवणभक्ती होय.

या श्रवणभक्तीने केवळ सात दिवसात उद्धरून जाणारा महाभागवत राजा परीक्षित होय. श्रीशुकाचार्यांनी त्याला भागवत ऐकविले.

त्यात ज्ञान, वैराग्य आणि प्रेम यांनी परिपूर्ण असलेल्या श्रीकृष्णाच्या लीला वर्णन केल्या. परीक्षिताने 'सर्वांगाचे करूनी श्रवण' अशा उत्कटतेने भागवताचे गुरुमुखाने श्रवण केले आणि एका सप्ताहात परमगती प्राप्त करून घेतली. त्याच्याच निमित्ताने सर्वांना उद्धरून नेणारा श्रीमद्भागवत ग्रंथ सर्वांना उपलब्ध झाला. ही सर्व राजा परीक्षिताचीच कृपा !

(२) कीर्तन

साधुसज्जनांच्या मुखातून जे भगवंताचे षड्गुणैश्वर्य श्रवण केले, ज्या लीला गुरुमुखाने ऐकल्या, त्याच स्वमुखाने पुनःपुनः वर्णन कराव्या. तेच कीर्तन होय. या कीर्तनभक्तीचे आदर्शभक्त देवर्षि श्रीनारद आहेत. कीर्तनाची परंपरा त्यांचेपासूनच सुरू झाली. ते कीर्तन-परंपरेचे आद्य आचार्य आहेत.

महाराजांनी या कीर्तनरंगातील संगती कशी असावी याची सूचना फार मार्मिकरित्या केली आहे. महाराज म्हणतात- श्रीगुरुदेव समोर असतील तर कीर्तनातील मंगलाचरणात साकाराचे चरित्र वर्णन करावे आणि ते जर समोर नसतील तर निर्गुणब्रह्माचे निरूपण करावे; पण दोन्हीवेळी हृदयात मात्र सगुणाचेच ध्यान असू द्यावे.[२२] हीच हरिगुणकीर्तनरूपा भक्ती होय. भागवतात-

प्रगायतः स्ववीर्याणि तीर्थपादः प्रियश्रवः।
आहूत इव मे शीघ्रं दर्शनं याति चेतसि ॥

''भगवान नारद म्हणतात की 'मी वीणेचे तार छेडले की भगवान् बोलावल्याप्रमाणे माझ्या हृदयात आविर्भूत होतात.'' हे नारदाचार्य कीर्तनाचे उद्गाते आहेत तसेच श्रीशुकाचार्य देखील या कीर्तनभक्तीचेच परम आदर्श आहेत.

त्यांनी भागवतात भगवंताचे गुण आणि लीला गायिल्या आणि परीक्षिताचा उद्धार केला. 'वैय्यासकिः कीर्तने'॥

(३) स्मरण

जेव्हा आपण संतमुखाने भगवल्लीलांचे श्रवण करीत नाही किंवा स्वमुखाने कथन करीत नाही, त्यावेळी त्या लीलांचे अन्तःकरणात स्मरण करीत असावे. या एकांतातील स्मरणामुळे कीर्तनाचा आनंद अन्तःकरणातही कायम मिळत राहतो.

भक्त प्रल्हादाने अगदी बालपणापासून 'नारायण' या नामाचे सतत स्मरण केले. अशा प्रकारे भक्त प्रल्हादाने जागृतीत, स्वप्नात व सुषुप्तीत अखंड स्मरण केल्यामुळे नरसिंह अवतार घेऊन भगवंताने त्याचे संरक्षण केले. असा प्रल्हाद महान भक्त म्हणून आजही सर्वांना

वंदनीय असा आदर्शभूत आहे.

या नामस्मरणानेच योगाची अष्टांगे साधून भक्त पूर्ण कसा होतो याचे वर्णन महाराजांनी एका अभंगात[२३] केले आहे.

योगाचे अष्टांग नामींच मिळती ।
नाम ते वेदांती मिश्रित की ॥ ...

१- नाम घेतले की इंद्रियांची विस्मृती होते. यालाच **'यम'** म्हणतात.

२- नामामुळे अन्तःशुद्धी होते. चित्ताला संतोष मिळतो. जीवमात्राच्या विषयी दया उत्पन्न होते. हाच हरिभक्तांचा **'नियम'** होय.

३- स्मरण करताना कधीकधी देह स्तब्ध होऊन जातो. हीच भक्तांची **'आसन'** सिद्धी होय.

४- नाम घेत असताना कंठ सद्गद् होतो, श्वासही बंद होतो, हेच **'प्राणसंयमन'** होय. कुंभकादि सर्व प्राणायाम येथेसाधला जातो.

५- नाम स्मरतेवेळी मनाचे आकळण होते. यालाच योगातील **'प्रत्याहार'** म्हणतात.

६- मन एकाग्र होऊन भगवच्चरणी स्थिर होते तीच योगातील **'धारणा'** होय.

७- नंतर अन्तःकरणात श्रीहरीचा अविर्भाव होतो, तेच हरिभक्तांचे **'ध्यान'** होय.

८- या हरिसंगाने भक्ताला अन्तर्बाह्य-सर्वांचा विसर पडतो तीच **'संप्रज्ञात समाधी'** होय. असे योगाचे आठही प्रकार स्मरणभक्तीमध्ये भक्ताला पूर्ण प्राप्त होतात.

(४) पादसेवन

संत हे ईश्वर आहेत असे समजून त्यांची, तशीच श्रीगुरूंची किंवा आपल्या आवडीच्या मूर्तीची प्रक्षालनादि उपचारांनी पादपूजा करणे म्हणजे 'पादसेवन' होय.[२४]

या पादसेवनभक्तीत श्रीलक्ष्मी हीच

सर्वश्रेष्ठ आहे. क्षीरसमुद्रात शेषनागावर विश्रांती घेत असलेल्या भगवान् विष्णूच्या चरणांचे संवाहन ती अखंड करीत असते. त्याचप्रमाणे गुरुपुत्र म्हणून जे भक्त प्रसिद्ध आहेत ते देखील,

ताट मी काढीन । सेज मी झाडीन ।
चरणसंवाहन । मीचि करीन ।। ज्ञाने.अ१३

असेच चरणसंवाहन करतात किंवा संतांचे वाहणधर होऊन अखंड सेवा करतात. हीच पादसेवनरूपा भक्ती.

(५) अर्चन

अर्चन म्हणजे षोडशोपचारांनी प्रीतिमात्र असलेल्या अनध्यस्तविवर्त भगवद्विग्रहाचे सर्वांगपूजन करणे.[२५] आपल्याला जे जे पदार्थ प्रिय वाटतात ते ते सर्व भगवंताला समर्पण करणे. दहीदुधाने स्नान घालणे, वैदिक, पौराणिक मंत्रांनी अभिषेक करणे, सुवासिक

फुले वाहणे, सुगंधी द्रव्यांचे विलेपन करणे, धूप, दीप, नैवेद्य, आरती वगैरेंचा अर्चनात समावेश होतो.

आपल्या ऐपतीप्रमाणे जे जे काही उत्तमोत्तम भोग शक्य असतील ते ते सर्व आणून भगवंताला निवेदन करावे. आणि प्रत्यक्षात जर शक्य नसेल तर मनानेच उत्तम पदार्थांची भावना करून उच्च प्रकारचे भोग भगवंताला समर्पण करावे. भावना दृढ होण्यासाठी प्रत्यक्षपूजेपेक्षा मानसपूजा श्रेष्ठ आहे. ''रत्नैः कल्पितमासनं....'' रूपी श्रीशंकराचार्यांचे स्तोत्र मानसपूजेचे यथार्थ दर्शन घडविते. किंवा श्रीगुरुसेवेची अभिलाषा करणारा भक्त मानसपूजा कशी करतो याचे ज्ञानेश्वरीतील वर्णन अतिशय हृद्य आहे-

'कां चैतन्याच्या पोवळीं । माजी आनंदाच्या राऊळीं । श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ।।

उदयिजता बोधार्का । बुद्धीची डाल सात्त्विका । भरोनिया त्र्यंबका । लाखोली वाहे ।। काळशुद्धी त्रिकाळी । जीवदशा धूप जाळी । ज्ञानदीपे ओवाळी । निरंतर ।। सामरस्याची रससोय । अखंड अर्पित जाय ।।...मग सर्वभावेसी परिवारी । आपण होय ।।' ज्ञाने.अ.१३

अशा प्रकारच्या मानसपूजेपासून बाह्यसेवेपर्यंत गुरुभक्त श्रीगुरूंना सर्व प्रकारचे भोग अर्पण करतो; किंबहुना स्वतःच गुरुसेवेचे सर्व उपकरणे आणि उपचार होऊन जातो आणि अन्तर्बाह्य सेवा करतो. ''...श्रीगुरुसेवा समस्त । वेटाळीन वस्तुजात । होऊनिया ।।'' अशा मानसपूजेचा अनुभव घेणारा शिष्योत्तम धन्य होय. अशी प्रत्यक्ष आणि मानस अर्चनभक्ती केल्यामुळे भोग्य पदार्थाविषयी साधकाचे मन उपराम पावते. ते सर्व भोग उपास्याला अर्पण

केल्यामुळे भगवंताचे ठिकाणी मन एकाग्र होऊन मृदू संवेगाचा तीव्र संवेग होण्यास फार मदत होते.[२६]

या भक्तीचा आदर्श भक्त भगवतातील पृथू राजा होय. किंबहुना सर्वच परमेश्वरप्राप्ती करून घेतलेले भक्त बाह्यपूजा आणि मानसपूजा करणारे असल्यामुळे ते सर्वच आदर्श आहेत, असेही म्हणावयास हरकत नाही.

(६) वंदन

अर्चनभक्तीमध्ये पूजा करीत असताना ''मी पूजा करणारा आहे'' असा अभिमान उत्पन्न होतो. तो पूजाभिमान नष्ट करण्यासाठी सर्व प्रकारची लोकलाज सोडून भगवंताला साष्टांग नमन करावयास हवे. अशा नमनाने आपोआप दीनता आणि लाघव साधकाकडे येते.

'ते वाचाऋण इया । न फेडवेचि मरोनिया । ते

पाया पडोनि मियां । सोडविले ।। लघुत्वाचेनि मुद्दले । बैसला गुरुत्वाचे सेले ।।' अमृ०।।

नमन केल्याने अत्यंत लहानपणा स्वतःकडे येतो. त्या लहानपणाच्या बळावरच साधक पूर्णअशा गुरुपदावर आरुढ होतो. ही वंदनभक्ती साधकाला जशी उपयोगी आहे तशी ज्ञानोत्तर भक्तीलाही परिपोषक आहे. ज्ञानानंतर नमन केल्याने 'अहं ब्रह्मास्मि' हे वाचाऋण देखील नाहीसे होते.

उदा.- अक्रूरांनी भगवंताची पाऊले धुळीत उमटलेली पाहिली आणि त्यांना प्रेमाचे भरते आले. त्यांनी मार्गावरच, पाऊले उमटलेल्या धूळीत लोळण घेतली. या वंदनभक्तीमुळे श्रीकृष्णांनी अक्रूरांवर कृपा केली आणि यमुनास्नानाचे वेळी स्वतःच्या क्षीरसमुद्रस्थ शेषशायी स्वरूपाचा त्यांना साक्षात्कार करून दिला.

(७) दास्य

वंदनभक्तीने दीनता अन्तःकरणात रुजली की मग सेवक जशी स्वामीची सेवा करतो त्याप्रमाणे भक्त भगवंताची सर्व प्रकारची सेवा आनंदाने करू लागतो. पूजा करूनही पूजकत्वाचा अभिमान त्याला शिवत नाही. मंदिराच्या झाडलोटीपासून तो चरणसंवाहना-पर्यंत सर्व प्रकारचे दास्य करतो.

भगवान् रामचंद्राचे दास्य करणाऱ्या हनुमानाला तोड नाही. श्रीगुरूंची सेवा करताना तर साधकाच्या उत्साहाला सीमाच नसते. श्रीगुरूंचे जोडे पुसण्यापासून, कपडे धुण्यापासून तों जेऊ घालण्यापर्यंत सर्व सेवा तो मोठ्या आवडीने करतो. गुरुपरिचर्या हेच त्याचे नित्यकर्म असते. इतर सर्व साधनांचा परित्याग करून एकविध भावनेनतो गुरुसेवा करतो. इतर

साधनांचा त्याग झाल्याने आपोआपच त्याचे अंगी 'अनन्य दीनता' बाणते.

श्री गुलाबरावमहाराजांचे शिष्योत्तम बाबाजीमहाराज पंडित यांनी तंतोतंत अशीच सेवा केली. त्यांचे विषयी महाराजांनी उद्गार काढले की, 'पंडिताच्या सेवेला मी वश झालो आहे' हे आपल्या पाहण्यातले विसाव्या शतकातील उदाहरण आहे.

(८) सख्य

दास्यभक्तीने दीनता आणि लघुता अंगी बाणली की भक्त स्वतःला निरसाधन समजू लागतो. त्याला वाटते की 'आपण श्रीगुरूंची किंवा भगवंताची पूर्णपणे सेवा करूच शकत नाही. आपल्यात कितीतरी उणीवा आहेत' अशी दीनभावना तीव्र होऊ लागली की त्याचा त्राता भगवंताशिवाय कोणीं राहत नाही.त्याच्या आर्त

(२५)

पुकाराला भगवान 'ओ' देतो आणि त्याचा मित्र होऊन राहतो.[२७]

अशा रीतीने भगवानच त्याचा सखा झाला की मित्रत्वाच्या नात्याने तोच त्याला परमार्थाच्या उच्चासनावर नेऊन बसवितो. याचे उत्तम उदाहरण कृष्णार्जुनांचे आहे. मित्र मित्राशी मनात येईल तसे वागतो. अर्जुन कृष्णाशी भांडला, कुस्ती खेळला, कृष्णाला आपल्या रथाचे सारथी केले, घोडेसुद्धा धुवावयाला लावले; पण भगवंताने आपला मोठेपणा पाहिला नाही. उलट पापण्या जशा नेत्रांचे रक्षण करतात तसे अर्जुनाचे मित्ररूपाने रक्षण केले आणि युद्धासारख्या भलत्या प्रसंगी त्याचा मोह दूर करण्यासाठी गीता देखील सांगितली. तीत उपदेश केला, विश्वरूप दाखविले आणि आत्मज्ञानसंपन्न केले. बरे, इतकेहीं करून शेवटी म्हणतो काय, तर

(२६)

'यथेच्छसि तथा कुरु' तुलाआवडेल तर कर नाहीतर सोडून दे.' आज्ञेचा वासही येथे नाही अशा सुहृत्प्रेमातून उत्पन्न झालेली भगवद्गीता आज जगातील सर्वश्रेष्ठ व सर्व तत्त्वज्ञानांची जननी ठरली आहे. हा सर्व सख्यभक्तीचाच मधुरतम आविष्कार!

वरील आठ प्रकारची भक्ती एकापेक्षा एक श्रेष्ठ आहे असे म्हटल्यास चालू शकेल. पण त्यात लक्षात ठेवावयास हवे की यातील कोणत्याही एका भक्तिप्रकाराचा आश्रय घेतला आणि दृढ निश्चयाने भगवंतावर निष्काम प्रेम केले तर तीच भक्ती शेवटच्या पराभक्तीपर्यंत साधकाला नेऊन पोचविते. श्रवणाने परीक्षित राजा उद्धरून गेला, स्मरणाने प्रल्हादाला परमस्थिती प्राप्त झाली; त्याचप्रमाणे आठही प्रकारच्या भक्तीचा आश्रय घेतलेले सर्वच भक्त

(२७)

परमपदाला पोचले. दृढ निष्ठा ठेवून कोणत्याही एका प्रकारच्या भक्तीचा आश्रय घेतला की त्याचे फलित म्हणून जीवब्रह्मैक्याचा अनुभव येतो आणि आत्मज्ञानाने संपन्न होऊन भक्त सज्ञान पराभक्ती प्राप्त करून घेतो.

परंतु शास्त्रीय पद्धतीने भक्तिप्रकारांची वर्गवारी लावावयाची असल्यास मात्र एकाहून एक चढत्या पायरीने आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. त्यानुसार हे आठही प्रकार सुरवातीला गौणी भक्तीतच समाविष्ट होतात. गौणी भक्तीत द्वैत असते. मी भक्त आहे व भगवान माझ्याहून वेगळा आहे अशी भेदबुद्धी येथे कायम असते. ही भेदबुद्धी आत्मनिवेदन केले असता नाहीशी होते.

(तक्ता ५)(तक्ता६)

(२८)

'मध्यमा' : ज्ञानोत्तर भक्ती

आत्मनिवेदनाने जीव-ब्रह्माचे ऐक्य होत असल्यामुळे म्हणजे ज्ञानप्राप्ती होत असल्याने, आत्मनिवेदनरूप नवव्या भक्तीला महाराजांनी 'मध्यमा' या प्रकारात समाविष्ट केले आहे. वरील अष्टविधा भक्तीतील 'मी उपासना करणारा आहे' ही अहंता नाहीशी करण्यासाठी भगवंताच्या चरणी आत्मनिवेदन केले जाते. या अहंतेचे दोन प्रकार आहेत. ममता आणि अहंता. हे दोन्ही प्रकार समर्पण झालें की जीवब्रह्माचे ऐक्य होते. आत्मज्ञान होते म्हणून ही भक्ती गौणनसून ज्ञानोत्तर मध्यमा [२८] आहे.

(९) ममता समर्पण - (आत्मनिवेदन)

इदं-प्रत्ययाने निर्दिष्ट असलेले सर्व 'मम' मध्ये अंतर्भूत होते. 'मला पाहिजे असलेले' आणि 'माझे असलेले' सर्व भगवंताला अर्पण

केले की ममतासमर्पण झाले. ''पुत्र, मित्र, कलत्र, गोत्र, वित्त, घरदार व सर्व परिवार माझा नसून भगवंताचा आहे. सर्व भोग्यजात भगवंतालाच अर्पण असो.'' असे भगवच्चरणी निवेदन करून त्या सर्वांपासून म्हणजे- 'मम' या षष्ठीप्रत्ययापासून स्वतःची सुटका करून घेणे, हेच ममतासमर्पण होय.

बलिराजाने आपले 'सर्व-स्व' भगवंताला अर्पणकेले. त्या वेळी वामनावताराने पहिल्या दोन पावलात पृथ्वी आणि स्वर्ग व्यापून टाकले. आणि बलिराजाचे ममता असलेले सर्व पदार्थ भगवंताने हरण केले, त्यामुळे बलिराजाची ममता नाहीशी झाली. हे अर्धे आत्मनिवेदन झाले.

(१०) अहंता समर्पण - (आत्मनिवेदन)

आपण अन्नमय देहाला, 'मी' समजतो, म्हणून अहंता समर्पण करायची असल्यास प्रथम

आपला देह भगवदर्पण करायला हवा. देह आणि श्रोत्रादि सर्व इंद्रिये भगवंताचीच आहेत असे समजून त्यांचा उपयोग भगवंतासाठीच केला पाहिजे. नंतर प्राण, मन, बुद्धी आणि शेवटी अहंकार देखील अर्पण झाला पाहिजे. देहापासून बुद्धी-अहंकारापर्यंत सर्व अहंतास्पद पदार्थ अर्पण झाले की शेवटी 'मी' नसून भगवानच आहे असा अनुभव येतो. हेच पूर्ण अहंतेचे पूर्ण समर्पणहोय.

या भक्तीचा प्रत्यय हनुमन्नाटकातील हनुमानाच्या वाक्यावरून जाणवतो. हनुमानाने द्रोणाचल पर्वताचे शिखर आपल्या हातावर उचलून आणले. पण त्याला वाटले की- ''या फांदीवरून त्या फांदीवर उडी मारणारा मी शाखामृग आहे. मी द्रोणाचल कसा उचलू शकणार? भगवान् रामानेच तो आपल्या

सामर्थ्याने आणला''- हेच अहंतासमर्पण होय.

त्याचप्रमाणे सर्व संतांनी देखील आपल्या वाङ्मयीन कार्याचे सर्व कर्तृत्व भगवंतालाच दिले आहे. 'तो बोलविल्या मी बोलेन, तो चालविल्या मी चालेन' अशीच त्यांची स्वतःबद्दल वृत्ती असते. आत्मनिवेदन पूर्ण झाल्यामुळे- ''मी कर्ता आहे'' असे त्यांच्या मनातच येत नाही. 'झाडाचेही पान हाले ज्याचे सत्ता । राहिली अहंता मग कोठे?'' असा अहंकाराचा लोप झालेला असतो.

'अर्जुनपण न घेता । मीपण उठे जे पंडुसुता ।।' या ओवीत ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे मी-पणावर आरूढ न होता त्यांचे सर्व व्यवहार होत असतात. भूतावेशन्यायाने भगवंताचा आवेश त्यांच्या चित्तात झाल्यामुळे भगवानच सर्व व्यवहार करीत आहे असा आत्मज्ञानसंपन्न भक्तांचा प्रत्यय असतो.

हेच पूर्णआत्मनिवेदन होय.

यापूर्वी सांगितलेले बलिराजाचे उदा. येथेही लागू होते. पहिल्या दोन पावलात ममतासमर्पणझाले आणि 'तिसरे पाऊल माझ्या मस्तकावर ठेव' असे भगवंताला म्हणून बलिराजाने आपले मस्तक पुढे केले आणि भगवंताने त्यावर पाऊल ठेवून त्याचे सर्वस्व घेतले. याप्रकारे बलिराजाने सर्व त्रैलोक्याच्या राज्यासह ममतेचे आणि देहासुद्धा सर्व अहंकाराचे दान दिले, तेव्हा भगवान् स्वतः त्याचे द्वारपाल झाले. म्हणून बलिराजा असुर असूनही आत्मनिवेदन भक्तीत श्रेष्ठ गणला जातो. ''देवस्यात्मनिवेदने बलिरभूत् सर्व-स्व-संपूजने''

लालन-वात्सल्य-माधुर्य

तस्यैवाहम्, ममैवासौ व स एवाहम्

(३३)

भगवच्चरणी अहंता व ममता या दोन्ही प्रकारचे आत्मनिवेदन झाले की नंतर उठणाऱ्या भक्तीच्या सर्वच वृत्ती ब्रह्मज्ञानासह असतात. अद्वैतसमाधीतून व्युत्थान होताना जी अहंवृत्ती स्फुरण पावते ती ज्ञानज आणि प्रेमज अशी दोन प्रकारची असते. ज्ञानज वृत्तीत जाणिवेचा म्हणजे चित्‌चा अंश प्रधान असतो. आणि प्रेमजवृत्तीत प्रेमाचा म्हणजे आनंदाचा अंश प्रधान असतो. चिदंश म्हणजे जाणीव. ही आनंद देणारी नसल्यामुळे चिदंशाचा अभिभव करून, भक्त प्रेमज वृत्तीचा म्हणजे भक्तीचा आश्रय घेऊन ब्रह्मानंदात अखंड निमग्न होतात. जाणिवेला म्हणजे ब्रह्माच्या चिदंशाला प्रधान होऊ देत नाहीत. अशा आनंदाचे प्राधान्य असलेल्या भक्तीचे तीन प्रकार आहेत.[२९]

(३४)

तस्य एव अहम् ॥

मम एव असौ ॥

स एव अहम् ॥

आत्मनिवेदनाने ममता व अहंता समर्पण झाली की भक्त समाधीत आत्मैक्य करून अद्वैत-ज्ञानाने पूर्ण होतो. या समाधीत तो परब्रह्माशी संपूर्णतः एकरूप झालेला असतो. परंतु ब्रह्माचा स्फुरण पावणे हा स्वभाव असल्यामुळे तो पुनःपुनः व्युत्थानही पावत असतो.

या व्युत्थानात त्याला ऐक्याची जाणीव म्हणजे स्मृती असते. या जाणिवेमुळे त्याची समाधीत असलेली आनंदरूप अवस्था व्युत्थानदशेत कमी किंवा नाहीशी झालेली असते. व्यतिरेकाने घेतलेल्या हृदयस्थ आन्तर् ब्रह्मानंद व्युत्थानामध्ये त्याला मिळत नाही. खरोखर पाहतां आत-बाहेर असे काही नसून, सर्वत्र

(३५)

एक व्यापक ब्रह्मच असल्यामुळे आतील आनंदानुभव बाहेर देखील म्हणजे व्युत्थानात-वृत्ती स्फुरण पावली असताना- मिळावयास हवा. हा हृदयस्थ आनंद बाहेरही मिळविण्यासाठी बाहेरची मिथ्या ठरविलेली नामरूपे परब्रह्माचीच आहेत असा अनुभव यावयास हवा. ज्ञानमार्गाने उपपत्तीपूर्वक तसा निश्चय होत असतो.[३०]

''स्वानुभूत्योपपत्त्या'' असे श्रीशंकराचार्य स्वात्मानुभवात प्रतिपादन करतात.परंतु सगुणाच्या भक्तीमुळे हा अन्वयाचा अनुभव स्वानुभूतीने येतो, उपपत्तीची गरज नसते.

हा अन्वयानुभव पूर्णरूपाने येण्यासाठी मनात उठणारा प्रत्येक विकार, प्रत्येक वृत्ती सगुण श्रीहरीवरच अर्पण झाली पाहिजे. म्हणजेच व्युत्थानात उठणारी प्रत्येक वृत्ती सगुण विग्रहासाठीच उठली पाहिजे. परंतु हे एकाएकी

(३६)

होत नाही. हा अभ्यास करण्याच्या तीन पायऱ्या आहेत-

(१)तस्यैवाहम् (२)ममैवासौ (३)सएवाहम्.

यांचा क्रमशः लालन, वात्सल्य व माधुर्य या भक्तिप्रकारांना आधार आहे.

(११) तस्यैवाहम् - लालनभक्ती

आत्मनिवेदन पूर्ण झाले की भक्त-भगवंताचे ऐक्य होते. या ऐक्यसमाधीतून भक्त व्युत्थान पावला की अहंवृत्ती उत्पन्न होते. हा अहंवृत्तीवर आरूढ असलेला कोण? तर ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - **आम्ही हरीचे भूषावयालागी । ऐसा अभिमान वाहती आंगी ॥** या ओवीत वर्णिल्याप्रमाणे हरीला भूषविण्यासाठी सेवक म्हणून आम्ही आहोत, अशी प्रेमवृत्ती उत्पन्न होते. हे **'ज्ञानज-तस्यैवाहम्'** होय. मी कोणाचा तर भगवंताचा ! अशी 'तस्य एव

(३७)

अहम्'रूपिणी भक्ती असते.[३१] 'मी भगवंताचा आहे' असे म्हणण्यात स्वतःकडे लहानपण येते व मोठेपण भगवंताकडे जाते. भगवान् व श्रीगुरु एकच असल्याने श्रीहरीची किंवा श्रीगुरूंची भक्ती तो करतो. 'मी त्याचा आहे', असे म्हणताना मातापिता समजून भगवंतावर लालन प्रेम असते.

भक्त स्वतःला ज्ञानाहंता येईल म्हणून या ज्ञानाहंतारूप संकटातून वाचविण्यासाठी भगवंताला 'पिता' म्हणून हांक मारतो. आणि आवडीने आळवावयाचे असले तर लडिवाळपणे 'आई' म्हणून हांक मारतो. किंवा ज्ञानाभिमान कमी होऊ लागला की भगवानच पितृत्व सोडून आई होऊन भक्ताचे लळे पाळतो. किंवा गुरूलाच मातापिता समजून ही लालनभक्ती केली जाते.[३२] प्रीतिनर्तन अ.२ मधे महाराज बाळकृष्णाचे वर्णन करतात-

(३८)

नातरी भूक नसोनी पोटी । बाळ आक्रंदे मातृभेटीं । काहीच भय नसता नेहटी । थरथर कांपे ॥६२॥ उगीच माती घाली मुखीं । बेचव लागता होय दुःखी । मग रडोनिम्हणे शेखी । कडिये घेई मज माये ॥६३॥

आत्मज्ञानामुळे संसार हारपला तरी ज्ञानाहंकाररूपी बागुलबोवा अस्तित्वात आहे अशी कल्पना करून बालभावाने भक्त रडूं लागतो. आणि हे श्रीगुरो, हे ताता, अशा आर्त हाका मारू लागतो. त्यामुळे 'मी ज्ञानी आहे, असा ज्ञानाभिमान न उठता मी गुरुपुत्र आहे - अशी सुखद प्रेमवृत्ती उठते. कैवल्यरूपी भातके तो झुगारून देतो. आई, आई, म्हणत वेडा होऊन आक्रंदन करतो. सद्गुरूंची कृपादृष्टी मज एकट्यावर नसून सर्व सृष्टीवर पसरली आहे असे मनात येताच तो भक्त स्वतः पृथ्वी एवढा

(३९)

कूर्म होऊन जातो. पण तसे केले असता दुःग्धपान करता येत नाही. म्हणून पुनः स्वतः वासरूं होऊन पशुत्व देखील आपल्यावर ओढवून घेतो.

पुढे त्याच्या अंतःकरणात क्रोधाविकार येताच तो गुरुमाऊलीला म्हणतो - मी कूर्म झालो तेव्हा तुम्ही मला केवळ कृपादृष्टीच्या निमित्याने फसविले. वासरू झालो तेव्हा दूध पाजून फसविले. मग वैकुंठाचे खेळणे मला दिले. आता मला तुमचे मोक्षरूपी भातकेसुद्धा नको, असे म्हणून तो क्रोधाने आक्रंदू लागतो. बरेरांगत रांगत माउलीकडेजावे म्हटले तर त्याला दिशाच दिसत नाहीत- म्हणून एके जागी स्थिर होऊन तो रडू लागतो. असे भक्ताचे अन्तःकरणात करुणारसाचे कल्लोळ उचंबळून आले की पूर्ण ब्रह्मच गुरुमाऊलीच्या रूपाने प्रगट होते. तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर हसूं उमलते.

(४०)

पण त्यावेळी तो तिला जगन्माता म्हणत नाही. कारण त्याला भीती वाटते की ती साऱ्या जगाला स्तन्य पाजू लागली तर माझेकडे दुर्लक्ष होईल. म्हणून तो -

'माझी माय म्हणोनी । उघडपणी रडे ॥'
'ऐसे म्हणोनी । रडतां विसरे दिवसरजनी ॥'

आणि शेवटी माउलीने मांडीवर घेतले की आनंदाने हसूं लागतो. अशाप्रकारे रडून आणि हसून तो गुरुमाउलीचे मनोरंजन करतो. याचना मात्र कशाचीही करीत नाही. मनात उठणारे लालनप्रेमाचे सुकोमल भाव असोत की इतर कठोर भाव असोत, सर्व भाव एका गुरूंचेच चरणी अर्पण करीत असतो. महाराजांनी प्रीतिनर्तनातील लालनाभिनयात हे सर्व भाव रसाळ रीतीने शब्दांकित केले आहेत. ते शब्दांकन पाहताना ही लालनभक्ती तस्यैवाहम्

भक्तीची पूर्णावस्था आहे असे दिसून येते.

या बाळाचे ऐसे बळ । मायेस रंजवीत रंजे प्रबळ । बाळ माता, की माय बाळ । भेद न कळे ॥९०॥

अशा या लालनभक्तीत लालनाला धरून असलेले सोहंकोधविकार, सोहंलोभविकार वगैरे नाहीसे होतात. म्हणजेच वाचाऋणाचे काही अंश कमी होतात. हे वाचाऋणाचे काही अंश कमी होणे म्हणजेच ''ज्ञानज तस्यैवाहम्'' नाहीसे होऊन 'प्रेमज तस्यैवाहम्'' शिल्लक राहणे होय.

भक्त प्रल्हादाचे रक्षण त्याच्या लालन भक्तीमुळेच भगवंताने नरसिंहावतार घेऊन केले. संत तुकारामादी संतांनी केलेले लालनपर अभंग या तस्यैवाहम् भक्तीचीच उदाहरणे आहेत.

(१२) ममैवासौ - वात्सल्यभक्ती

''मम एव असौ'' म्हणजे माझा भगवान्

आहे ही भावना; हिची पूर्णता म्हणजेच वात्सल्यभक्ती ! यामध्ये आतापर्यंत लालनादी भक्तीत भगवंताने भक्तासाठी जे कष्ट घेतले, त्यांच्या आठवणीमुळे भक्ताचे अन्तःकरण पिळवटून निघते. यापुढे मात्र भगवंताला कष्ट होऊ नये म्हणून भक्त भगवंताला आपले लहान बाळ समजतो आणि स्वतःकडेआईपणा घेतो. त्याच्या मनात येते की मी रडून रडून माझ्या श्रीहरीला फार कष्ट दिले आणि स्वतः मात्र त्याची काहीच सेवा केली नाही.

त्याला भक्तांचेइतिहास आठवतात की लालनभक्तीत पंढरीनाथ दामाजीसाठी महार झाला. जनाबाईकरता दळूं लागला. एकनाथांच्या घरी चंदन उगाळीत असे. प्रह्लादासाठी नृसिंहावतार घेतला. अशाप्रकारे लालनभक्तीत भगवान भक्ताकरता सर्व प्रकारचे कष्ट घेतो

पण भक्ताला दुःख होऊ देत नाही. हे सारे आठवून भक्ताचे अंतःकरण व्याकूळ होते म्हणून तो भगवंताला आपले बाळ करतो आणि स्वतः आई होऊन सर्व प्रकारे सेवा करतो.

खरोखर भगवान् व भक्तात भेद नाही. पण 'प्रेमाची नवाई' अशी आहे की भक्ताच्या कोमल चित्ताला भगवान सुखी व्हावा असे वाटते. या 'तत्सुखसुखित्वा'मुळेच तो नित्यनिर्मलाला स्नान घालतो. नित्यतृप्ताला भोजन करवितो. आणि सर्वव्यापक असलेल्याला कडेवरही घेतो. कदाचित् माझ्यासाठी भगवान् गुप्त रीतीने श्रम करील की काय, या भीतीमुळेच वात्सल्याचा आश्रय करून स्वतःकडे भगवंताहून मोठेपणा घेतो.[३३]

या प्रेमस्थितीत भक्ताने मौन धरले तर अन्तःकरणात पुत्रप्रेम असते. भक्त बोलू लागला

तर भगवंताचे गुण गातो आणि आठवणी सांगतो. भगवंताच्या सुकोमल बालस्वरूपाला कडेवर घेताना तर भक्ताची साक्षात् ब्रह्मानंदस्थितीच होऊन जाते.

हाताने उचलून कडेवर घ्यावे म्हणावे तर- माझे हात कठीण आहेत; त्यांचा कठीण स्पर्श माझ्या सुकुमाराला सहन होणार नाही, असे वाटून तो मनानेच भगवंताला उचलू पाहतो. पण पुनः त्याला वाटते की आपले बाळ तर त्रिगुणातीत आहे आणि मन हे तर त्रिगुणांनी बनले आहे. तेव्हा मलिन अशा मनानें त्याला कसे उचलावे? असे वाटून तो घडीभर तटस्थ होऊन जातो. ही ''तटस्थ-समाधी'' होय.

पण भगवंताला मात्र भक्ताचे हे ताटस्थ्य सहन होत नाही. या तटस्थ समाधीत प्रेमाचे सुख कसे अनुभवाला येणार? म्हणून भगवान्

(४५)

त्याला तटस्थ होऊ देत नाहीत. **'एकाकी न रमते'** हे श्रुतिवचन येथे भगवंताच्या साह्याला येते आणि भगवंताचे बालरूप रडू लागते आणि भक्तमातेच्या पायांना कवटाळते. तो प्रेमाचा स्पर्श होताच भक्ताचे प्रेम उचंबळून येते. आणि असेल त्या स्थितीत तो बाळाला कडेवर घेतो. ही प्रेमाची नवलाई इतकी वेड लावणारी आहे की भक्त पुरुष असला तरी या वात्सल्यप्रेमासाठी तो स्वतःकडे नारीत्व घेतो. आई होतो.

नयनांगणी खेळत । हृदयपाळणा रडत ॥

भक्ताची वृत्ती अंतर्मुख झाली तर त्याला हृदयरूपी पाळण्यावर बाळकृष्ण रडताना दिसतो आणि वृत्ती बहिर्मुख झाली तर डोळ्यापुढे खेळताना दिसतो.**'हरिरूप अखंड नयनापुढे'॥** देवनाथ. अशी भक्ताची अन्तर्बाह्य प्रतीती असते.

भक्ताची वृत्ती इतरत्र जाऊ लागली

(४६)

तर आईच्या पदराला धरून ती सावळी मूर्ती ''मला भूक लागली, दूध पाज'' असे म्हणून आपल्याकडेच ओढीत असते. तेव्हा आई दूध पाजते आणि आईचा सोहंकामविकार नष्ट होतो. या भक्तमातेचा भरंवसा तर असा असतो की - **'हा माझिया गर्भीचा ठसा । तो अंतर द्यावया सहसा । समर्थ नाही मजलागी ॥५०॥'**

हा माझ्या पोटचा गोळा आहे. माझ्या हृदयवटीचा गर्भ आहे हा मला अंतर देऊ शकत नाही. अशाप्रकारे **सोहंलोभविकार** देखील पूर्णपणे गोजिरवाण्या सावळ्या कृष्णाला अर्पण होतो.

महाराज म्हणतात, यशोदेच्या भजनाची रीती काही औरच आहे- **'मी म्हणे, न बोलवेल श्रुती ॥** कां तर तिने विश्वरूप पाहून देखील वात्सल्यभक्ती सोडली नाही. गर्गाचार्य, श्रीनारद

(४७)

वगैरे मुनी 'कृष्णच साक्षात् ब्रह्म आहे,' असे सांगत. ते सर्व ती हृदयात साठवून ठेवते. पण पुनः मात्र आपल्या तान्ह्या कृष्णाला प्रेमाने दहीभात खाऊ घालते. भगवान् गोकुळातून मथुरेला अवतार कार्यासाठी निघून गेले. पण यशोदेची वात्सल्यभक्ती यत्किंचितही मळली नाही.

भगवान् हृदयात अखंड रहावे म्हणून यशोदेने सोहं-कामविकार व सोहं-लोभविकार अर्पणकेले. पण तरीही तो ऐकेनासा झाला. तेव्हा मात्र तिने **'सोहं-क्रोधविकार-वेताटी'** बाहेर काढली. ते पाहताच भगवान् **''चळवळ कांपे जगजेठी । देवपण विसरोनि मिठी । भक्तपदी घाली''** पण इतक्यानेही मातेचा क्रोध शांत होत नाही असे पाहून - **ऐसेच मानोनी गोविंद । आई आई पुनः म्हणे ॥६७॥ वक्षोजांबरपदर । ओढोनि मागे दुग्ध परिकर ॥**

(४८)

अशा तऱ्हेने स्तनपान मागितल्यानंतर मात्र यशोदेचा सोहंक्रोधविकार नाहीसा होऊन ती कृष्णाला ओसंगी घेते. **स्तन घालोनिया वदनी । अखंड पय पाजी जागुनि । मायपुत्रा अभेदपणी । मिठी तेव्हा ॥७७॥**

याप्रमाणे सोहंकामविकार, सोहंलोभविकार व सोहंक्रोधविकार अर्पण करताना काही भलभलते शब्द मुखातून निघाले असले तरी त्यात शुद्ध प्रेमाशिवाय काहीही वेगळे नसते. **ती हृदयप्रेमभरे म्हणे । श्रम नकोत मम बाळा ॥६७॥**

अशाप्रकारचे काम, क्रोध, लोभ या विकारांसह येणारे सोहंरूपी वाचाऋण वात्सल्यभक्तीत नाहीसे होते आणि माय-लेकरांची अभेदपणी मिठी पडते. तरीसुद्धा भक्ताचे काही विकार भगवंताला अर्पणकरावयाचे राहूनच

(४९)

जातात. म्हणून शेवटी माधुर्यप्रेम करून वाचाऋण निःशेष नाहीसे करावयाचे असते.

माधुर्यभक्ती

प्रेमज 'स एवाहम्' प्रत्ययरूपा

लालन आणि वात्सल्य या प्रेमाची पूर्णता झाली की भक्ताचा बराचसा अभिमान कमी झालेला असतो. अशावेळी 'स एवाहम्'- या सामानाधिकरणाने एका पातळीवर येऊन बरोबरीच्या नात्याने भक्त भगवंतावर प्रेम करतो. या **'ज्ञानज स एवाहम्' प्रत्ययाला माधुर्याची जोड दिली की ती माधुर्यभक्ती होते.** 'ज्ञानज स एवाहम्' प्रत्ययाचा म्हणजे सोहंकामविकार, सोहंलोभविकार, सोहंक्रोधविकार वगैरे ज्ञानाभिमानासह उठणाऱ्या सर्व अविद्यालेशांचा नाश करावयाचा असतो.

(५०)

माधुर्यप्रेमात हे सर्व विकार भगवंताकडे लावले की आपोआप 'ज्ञानज सएवाहम्' प्रत्यय नाहीसा होऊन 'प्रेमज स एवाहम्' प्रत्यय माधुर्यभक्तीरूपाने विकसित होतो.[३५]

या माधुर्यभक्तीत अन्तःकरणातील कोणतीही वृत्ती असो, कोणताही विकार असो, तो भगवंताला आलंबन घेऊनच उठतो व सगुण भगवंतालाच अर्पण होतो.

पूर्वी जसे दास्यभक्तीत सख्यवृत्ती किंवा लालनादि प्रेमवृत्ती दाबून टाकाव्या लागत, किंवा वात्सल्यात माधुर्यवृत्ती दाबावी लागत असे, तसे या माधुर्यप्रेमात होत नाही. एक वृत्ती भगवंताकडे लावायची व दुसरीचा रोध करावयाचा असा अनिष्ट प्रसंग येथे कधीच येत नाही.

भोज्येषु माता शयनेषु रंभा.....

या सुभाषितात सांगितल्याप्रमाणे भावनेने

(५१)

स्त्रीत्व घेतलेल्या भक्ताच्या सर्व वृत्ती सगुण श्रीहरीसाठीच उठत असतात. दासी म्हणून, मित्र म्हणून, जेवताना माता म्हणून, पुत्र म्हणून, वगैरे सर्व प्रकारचे प्रेम माधुर्यप्रेमान्तर्गतच होऊ शकते. व्यवहारातील सर्व प्रकारच्या संबंधाने उत्पन्न होणारे प्रेम, पत्नीपणा न सोडता, पत्नी पतीवर करू शकते. त्याप्रमाणे या माधुर्यप्रेमात एक देखील वृत्ती भगवंताला सोडून उत्पन्न होत नाही; हीच माधुर्यप्रेमाची सर्वंकषता, व्यापकता आणि श्रेष्ठता आहे.

महाराजांनी माधुर्यप्रेमाची उपपत्ती देताना श्रीशांडिल्यमुनी, श्रीनारदाचार्य आणि मधुसूदन-सरस्वती यांचा समन्वय केला आहे.

श्री शांडिल्यमुनी -

'योगी वियोगोपलालन प्रेम' वदले ॥[३६]

(५२)

श्री नारदमुनी -

'अनिर्वाच्य प्रेम॥१५॥

***आत्मनि नारदोक्त भक्ती ।**

***अन्तःकरणी शांडिल्यरीती ।**

दोन्ही मिळोनी श्रीहरिमूर्ती । अन्तर्बाह्य ॥२२॥[३७]

श्रीनारद म्हणतात अनिर्वाच्य प्रेम म्हणजे भक्ती. आणि शांडिल्यमुनीनुसार वियोगोपलालन म्हणजे प्रेम. तेव्हा यांचा समन्वय असा -

अनिर्वाच्य प्रेम

प्रेम अनिर्वाच्य असते. जसे आपण आंबा खातो, पण त्याची गोडी वर्णन करू शकत नाही. त्याप्रमाणे हृदयात व्यतिरेकाने आत्मानुभव आला की तो ''इदंत्वेकरून वृत्तीने घेता येत नाही'' आणि वाणीने त्या आत्मानुभवाचे वर्णनही करता येत नाही. म्हणून 'आत्मनि' म्हणजे

(५३)

हृदयातील हा आत्मानुभव, हे आत्मप्रेम, अनिर्वाच्य आहे.

वियोगोपलालन प्रेम

पण पुढे भक्ताला अन्वय साधल्यानंतर, व्युत्थानदशेतजी अंतःकरणात वृत्ती उत्पन्न होते, ती वृत्ती अनध्यस्तविवर्त अशा सगुण भगवंताला आलंबन करते. हा आनंद ''इदंता इव अनध्यस्त विवर्त'' असतो. म्हणून आतील (आत्मनि) अनिर्वाच्य प्रेम बाहेर व्युत्थानात प्रेमवृत्तिस्फुरणाने व्यक्त होते. त्यावेळी 'संयोगे वियोगोपलालन' हे शांडिल्यांचे प्रेमलक्षण दिसू लागते.

१. आत्मनि नारदोक्त अनिर्वाच्य प्रेम.

२. अन्तःकरणात संयोगेऽपिवियोगोपलालन प्रेम.

३. या दोहोंच्या समन्वयामुळे -

'सात्मज्ञानभक्तिसिद्धी' आपोआप होते.[३८]

(५४)

याप्रमाणे वृत्ती लीन असताना आत्म्याच्या ठिकाणी अनिर्वाच्य प्रेम असते. आणि स्वभावतः वृत्तीचे स्फुरण झाले की ती वृत्ती अनध्यस्तविवर्त भगवंताकडे, वियोगात असणाऱ्या उत्कटतेनेच ओढली जाते. त्यालाच वियोगोपलालनरूपी प्रेम म्हटले जाते.

व्यवहारात विषयांचा संयोग झाला की तृप्ती होते. तशी तृप्ती भगवत्संयोगानंतर यावयास नको म्हणून वियोगातील उत्कटता कायम ठेवण्यासाठी, भक्ताच्या अन्तःकरणाची स्थिती संयोगात देखील 'वियोग-इव' उत्कट असते. अंतरात्म्यात भगवंताच्या नित्यसंयोगाचा अनुभव भक्तांना असतो. हीच 'सात्मज्ञान-भक्तिस्थिती' होय. व्युत्थानात वृत्ती उत्पन्न झाली तरी आत्मज्ञानसंपन्नता नाहीशी होत नाही. पण तरी देखील अतृप्त प्रेमाच्या उत्कटतेसारखीच

(५५)

भक्तांची प्रेमवृत्ती भगवंताकडे गंगौघाप्रमाणे अखंड वाहत असते.

योग आधी ओळखिजे । मग वियोग तो अनुभविजे । परी योगासी न चुकीजे । रहस्य हे ॥२४॥[३९]

'आत्मनि संयोग आणि बाहेरी वियोग' हे या माधुर्यप्रेमातील विरहावस्थेचे रहस्य महाराजांनी स्पष्ट दाखविले आहे. याप्रमाणे **'आत्मनि नारदोक्त भक्ती । अन्तःकरणी शांडिल्यरीती ॥** दोन्ही मिळून अखंड अंतर्बाह्य श्रीहरी मूर्तीचाच अनुभव भक्त घेत असतात आणि **'समाधीं व्युत्थानीं हरि विलसे'** अशीं अखंड समाधी साधून विदेहमुक्त स्थितीत जगदोद्धाराकरता लीलेने विचरण करीत असतात.

लालन व वात्सल्य भक्तीला पूर्णता आली की 'सएवाहम्' रूपी भक्तीचा प्रत्यय येऊ लागतो.

(५६)

लालन व वात्सल्यातील ज्ञानाची जाणीव नाहीशी करून त्याला माधुर्यप्रेमाची जोड दिली की, 'स एवाहम्' या सामानाधिकरणाने म्हणजे बरोबरीच्या नात्याने प्रेमाच्या यच्चयावत् सर्व वृत्ती- एकूण एक सर्व विकार- एका श्रीहरीवरच अर्पण्होऊ लागतात.

तेथ स एवाहं वृत्ति । न सांडिता दास्यस्थिती । यालागी पत्नीत्वाची प्राप्ती । ब्रह्मकुलैकपणे ॥७२॥ मज-परमात्मया भेदू नाही । यास्तव मागणे नसे काही । आणि तो नित्यतृप्त म्हणोनी लवलाही । देणेमज नसे ॥७३॥

असे असतांना प्रेम कशासाठी अर्पण करायचे, तर 'अहं ब्रह्मास्मि' हे वाचाऋण नाहीसे व्हावे म्हणून! आणि ते नाहीसे झाल्यानंत्र 'स्वाभाविक आवडी' म्हणून ! 'मी दासी होईन आणि माधुर्यप्रेमाच्या विंदानात मग्न होईन'

हीच एक कोमल भावना माधुर्यप्रेमाला कारणीभूत असते.

अशाप्रकारे महाराजांनी माधुर्यभक्तीची, समन्वयपूर्वक उपपत्ती दाखविली आहे. हिलाच पराभक्ती म्हटले आहे. या माधुर्यभक्तीचेसंयोग व वियोग हे दोन प्रकार करून पुनः त्यांचेही प्रत्येकी गुप्त आणि स्पष्ट असे दोन भेद दाखविले आहेत. असे हे पराभक्तीचे चार प्रकार प्रीतिनर्तन या ग्रंथातील पाचव्या व सहाव्या पदन्यासात सविस्तरपणे विवेचिले आहेत. त्यांचा परामर्श घेऊ.

पराभक्तीचे चार प्रकार

१३) गुप्त संयोगश्रृंगार.१४)स्पष्ट संयोगश्रृंगार.
१५) गुप्त विप्रलंभ. १६) स्पष्ट विप्रलंभ.

(१३) गुप्तसंयोगरूप माधुर्यभक्ती

भक्त आपल्या हृदयसंपुटात भगवंताचा साक्षात्कार करून घेतो पण बाहेर मात्र साऱ्या संसारात त्याला दुःख देणारे वैरी दिसतात. कामक्रोधादि सर्वविकार, मन, बुद्धी, अहंकार वगैरे सर्वच त्याच्या भगवत्साक्षात्कारात आड येत असतात. म्हणून या सर्व वैऱ्यांपासून दूर अशा आपल्या हृदयातच तो भगवंताला लपवून ठेवतो.

कधीकधी भक्त अहंकार व कामक्रोधादि विकारांना कुटुंब कल्पितो आणि स्वतःकडे परस्त्रीत्व घेऊन भगवंताचे हृदयमंचकावर स्वागत करतो.

क्रोध माझा भरतार मेल्याला ठेवला दूरी ।
मला लागली गोडी म्हणुनी मी हिंडते परद्वारी॥

या पदामध्ये या गुप्त संयोगाचे सुरेख वर्णन आले आहे.

माता रुक्मिणी

रुक्मिणीने जेव्हा भगवंताला पत्रिका पाठविली तेव्हाची तिची प्रेमावस्था महाराजांनी भगवद्भक्ति-सौरभात वर्णिली आहे.

''हे भगवंता ! श्रवणाने तुझे ठिकाणी आदर उत्पन्न होतो. मननाने तुझ्या भेटीची उत्सुकता वाढते आणि निदिध्यासन पूर्ण झाले की हृदयात तुझा साक्षात्कार होतो.''

तैं आत्मपणे फुटे दिठी । तंव साक्षात्कार परिपाटी ।
। जाहलिया सकळ परमार्थता गोमटी ।
पाणिसंपुटी फावत ॥६९॥[४०]

एवं प्रथम व्यतिरेकाने आन्तर्साक्षात्कार होतो व त्यानंतर बाह्य साक्षात्काराची म्हणजेच अन्वयानुभवाची ओढ लागते. रुक्मिणीला आन्तर्

साक्षात्कार झाल्यानंतर देखील तिचे सर्व नातलग वैरी आहेत असे वाटले.

शिशु म्हणजे अज्ञान । तयाचे करी जो पालन।
तो हा शिशुपाळ आपण ॥१३॥ अज्ञान पालक
अहंकारू । पाहेमज जीव करू ॥

याप्रमाणे रुक्मी हा सख्खा भाऊ देखील बाह्य साक्षात्कारात आड येणारा वैरी वाटत होता. म्हणून, या सर्वांचे पारिपत्य करून भगवंता तूं माझे पाणिग्रहण कर' असे तिने कृष्णाला विनविले.

शेवटी तर ती कृष्णाला म्हणते - ''तुला मुद्दाम द्वारकेहून येथे येण्याचे कष्ट घेण्याचेही कारण नाही. तूं माझ्या हृदयात आहेसच, फक्त हृदयातून तूं बाहेर ये म्हणजे झाले'' अशाप्रकारे आन्तर् साक्षात्कार असला तरी बाहेरही सगुणाचा साक्षात्कार होण्याची ओढ भक्ताला लागलेली असते.

(५१)

गोपींची स्थिती

गोकुळातील गोपींना गृहजाच होता. त्यांच्या अंतःकरणाची ओढ हृदयसंपुष्टात असलेल्या श्रीहरीच्या ठिकाणी लागलेली होती. गोप कुमारिकांनी त्यासाठी कात्यायनी देवीचे व्रत केले आणि महारासात बाह्यतः देखील कृष्णाला प्राप्त केले. बाहेर देखील सगुण भगवंताचा संयोग होणे हेच या गुप्तसंयोग भक्तीतील प्रेमाचे फलित आहे.

महाराज म्हणतात- ''गोपिकांचा हा प्रेमभाव आपण आपल्या हृदयात साठवावा आणि श्रीकृष्णाला पती म्हणून मिळवावे'' हा भावनेचा खेळ कर्तृतंत्र असला तरी यातील प्रेम हे मात्र वस्तुतंत्रच आहे.

हा भावनेचा खेळ । कर्तृतंत्र जरी सकळ ।
तरी येथ प्रेम प्रबळ । वस्तुंत्रचि ॥३७॥

(६२)

(१४) स्पष्ट संयोगरूपी माधुर्यभक्ती

या प्रेमाच्या योगाने मी परस्त्री आहे हा परकीयपणा झुगारून द्यावा. श्रीकृष्णाची कांता व्हावे आणि हृदयाच्या बाहेर देखील तीव्र संवेगाने प्राप्त झालेल्या श्रीकृष्णाला गाढ आलिंगन द्यावे. हाच गुप्तशृंगारानंतर मिळणारा स्पष्टसंयोग-शृंगार आहे.

सद्‌गुरुविश्वासवृत्तीच्या साह्याने आणि कात्यायनी व्रताच्या पूर्तीमुळे भगवान् श्रीकृष्ण रासक्रीडेत साक्षात् पती म्हणून लाभतात. म्हणजे हृदयातील भगवत्साक्षात्कार बाहेर देखील अनुभवला जातो. हाच अन्वयानुभव होय. गुप्तसंयोगशृंगारात असलेला मनाचा संवेग तीव्रतम झाला की डोळे मिटले तर हृदयात; आणि डोळे उघडले की बाहेर, अशी अन्तर्बाह्य सर्वत्र एक भगवंताची सांवळी सुकुमार मूर्तीच

(६३)

अनुभवाला येते. असा हा नित्य संयोग प्राप्त होणे म्हणजेच स्पष्टसंयोगशृंगार होय.

या अन्तर्बाह्य सगुणसाक्षात्काराने आपल्या सर्व इंद्रियांचा स्वामी श्रीकृष्ण आहे असाच अनुभव येतो. विषयांचे प्रियपण कृष्णसौंदर्याने हिरावून घेतले जाते. आणि मग सर्व इंद्रिये बाहेर जरी धावली तरी अन्वयेकरून सगुण भगवंताकडेच धावतात. व्यतिरेकाने हृदयात आलेलएकदेशीय सगुण साक्षात्कार बाहेर सर्वत्र विस्तार पावतो, व्यापक होतो, सर्व इंद्रिये बाहेर धावली तरी ती सर्व एका गोपीवल्लभालाच मिठी मारतात.

या प्रेमसोहळ्याचे वर्णन प्रीतिनर्तनातील पांचव्या पदन्यासात बहारीचे आले आहे. गोपीला वाटते- 'आम्ही सर्वस्वी तुझ्या असून आतापर्यंत हे कृष्णा,तूं आम्हाला कां फसविलेस?' असे त्या

(६४)

विचारतात आणि रागावतात हाच प्रणयकलह होय. या कलहात क्रोधाचा आवेश आणतात. पण या आविर्भावातही काय करतात तर श्रीहरीचे चरणच दृढ धरतात. असे हे प्रणयक्रोधाचे निर्वाण पाहून श्रीकृष्ण गोपीचा हात धरून समजावू पाहतात. पण तिचा मान अधिकच वाढतो. त्या मानाचा अर्थ एकच असतो- 'मला आतापर्यंत उपेक्षिले म्हणून आता मी मौन धरते'. –पण या मौनामुळे विचित्र प्रसंग ओढवतो. बाहेर भगवत्संयोगात मग्न असलेल्या वृत्ती हृदयात परतून येऊ लागतात. पण तेही गोपीला सहन होत नाही. तिला वाटते ''आपण भगवंताजवळ विनाकारण मान घेतला.'' हाच अपराध तिला टोचू लागतो. आणि ती पुनःपुनः मागे वळून श्रीकृष्णाकडे पाहू लागते. तिच्या वृत्ती हृदयात प्रवेशच करीत नाहीत.

(६५)

घडीं घडीं हृदयद्वारी येत । परी मागे फिरोनी प्रभुकडे पाहत । स्वापराधे खेदभरित । न जाय पुढे ॥५०॥

या प्रसंगाचे वर्णन जयदेवांनी उत्कृष्ट केले आहे. महाराजांनी त्यातील श्रीकृष्णाच्या मनोगताचे स्पष्टीकरण आपल्या प्रेमपूर्ण आणि रसाळ वाणीने करून विदर्भातील मराठी भाषेला परमप्रेमाच्या परतत्त्वस्पर्शाने पुनीत केले आहे.

भगवान म्हणतात- 'मला प्राप्त होऊनही मानाच्या वृत्तीमुळे कदाचित् ही गोपी पुनः जीवपणाला तर जाणार नाही?' म्हणून ते गोपीचे कर धरून तिला समजावतात की ''तुला जर जीवपणा आला तर मीच ''अव्यापक इव'' होऊन जाईन. माझ्याशी प्रेमळ शब्द बोला मोत्यासारख्या झळकणाऱ्या दंतपंक्तींनी माझा हा भयांधकार नाहीसा कर. माझ्यावरील सर्व

(६६)

कोप साडून दे. सर्व प्रकारची शिक्षा कर. मी ते सर्व सहन करीन. पण तूं माझ्यावर कोप मात्र करू नकोस आणि आपले मौन सोड पाहू !''

भगवंताच्या वाणीतून अशी विनवणी ऐकताच गोपीचा क्रोधावेश तर पूर्ण नाहीसा होतोच परंतु घडलेल्या अपराधामुळे तिचा जीव घाबरा होतो आणि तत्क्षणी ती भगवंतात मिळून जाते आणि भगवंताला अखंड सुख देण्याची प्रतिज्ञा करते.

मात्र या बाह्य मीलनात श्रीकृष्णालाच वियोगाचे भय वाटते. म्हणून भगवान् या गोपीच्या व्रताची पूर्ती करण्यासाठी- व्रतात यत्किंचितही उणीव न येण्यासाठी- वियोगाची उत्कटता गोपीच्या अन्तःकरणात रुजवितात; तेव्हा कुठे हा 'भक्तिरसोल्हास' गोपीला प्राप्त होतो. याची मुख्य खूण महाराजांनी सांगितली आहे -

(६७)

भगवंती आनंददानपालन । व्हाया वियोगोपलालन । परी संयोगाची खूण । सर्वथा जाण नाशेना ॥७२॥

भगवंताचा संयोग तर नाहीसा होत नाहीच पण वियोगात असलेल्या प्रेमाची उत्कटता देखील कमी होत नाही. अशा प्रकारचे हे माधुर्यभक्तीतील गुप्त व स्पष्ट संयोगशृंगाराचे दोन प्रकार आहेत.

आता गुप्त व स्पष्ट विप्रलंभ पाहू-

(१५) गुप्त विप्रलंभरूपी माधुर्यभक्ती

गुप्त विप्रलंभ म्हणजे हृदयातील भगवन्मूर्तीचा वियोग होणे. रासक्रीडेमध्ये गोपींना किंचित् अभिमान झाला.'आम्हाला भगवान् प्राप्त झाले. आम्ही धन्य झालो.' अशी धन्यता वाटली. म्हणजे भक्तीत रसास्वाद विघ्न आले. भागवतात-

तासां तत्सौभगमदंवीक्ष्य मानं च माधवः।
प्रशमाय प्रसादाय तत्रैवान्तरधीयत ॥४२॥

(६८)

गोपींचा सौभगमद नाहीसा करण्यासाठी आणि त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठी भगवान् त्यांच्या हृदयातच अन्तर्धान पावले. आणि गोपींना बाहेरही भगवान् दिसेना आणि हृदयातही दिसेना.

त्यावेळी गोपी म्हणतात- 'तुझ्या स्पष्ट-संयोगात तूं आम्हाला गाढ आलिंगन दिले. आम्ही केलेले अनंत अपराध तूं आपल्या पोटी घातले. पण आम्ही मात्र तुझ्याशी प्रणयकलह करून तुला शिणविले' अशा पश्चात्तापामुळे गोपींच्या सर्व वृत्ती भगवंताकडे एकतान पावतात. त्या प्रेमाच्या अवसरी व्यापक ब्रह्म चित्तात भरले जाते. पाठी पोटी आतबाहेर सर्वत्र एका व्यापक ब्रह्माचाच अनुभव येतो. परंतु -

जे सगुण होते अन्तःकरणी ।
ते लपूंपाहेंनिर्गुणी ॥६॥

(६९)

असा हा सगुणाच्या वियोगाचा प्रसंग आला की मग मात्र गोपी व्याकुळ होतात.

अवघिया वृत्ती ते क्षणी । चमकती साच्या ॥८॥

गोपींच्या सर्व वृत्ती विकल होऊन जातात. हृदयातील सांवळे ब्रह्म कुठे लपून बसले आहे, याचा त्या शोध घेऊ लागतात.

गोपींना धन्यतारूप अभिमान आल्यामुळे तोदूर करण्यासाठी भगवान् अन्तर्धान पावले. या धन्यतारूपी रसास्वादामुळे गोपींना पुनः देहाभिमान होईल की काय, असे भगवंताला भय वाटले. आणि त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठीभगवान् निर्गुणात लपले.

याचि भये गोविंद । करावया प्रसाद ।
निर्गुणीं लपे अभेद । होवोनिया ॥१२॥

किंवा भक्तांचा योगक्षेम चालविण्यासाठी म्हणजे गोपींना प्राप्त झालेल्या परमप्रेमाचे रक्षण

(७०)

करण्यासाठी म्हणूनच की काय भगवान् हृदय-संपुटात लपून उत्कट विरह प्रेमाचे रक्षण करू लागले. पण भगवान् निर्गुणात लपले की मन कठीण होऊ लागते. मन कठीण झाले की,

अद्रुते चेतसि ब्रह्मानुभव ।
ज्ञान बोलिजे या नांव ॥१९॥

ज्ञानांश प्रधान होऊ लागतो आणि मग प्रेमाची ओढ- प्रेमाचा आनंद कमी होऊ लागतो. असे विपरीत होऊ नये म्हणून भगवान् गोपींचे विरहप्रेम वाढवितात. असे झाले की या वियोगोपलालनाच्या तापकत्वामुळे अन्तःकरण द्रव पावून पुनः भक्तिरस पाझरूं लागतो. हा भक्तिरसाचा ओघ सतत भगवच्चरणांवर अर्पण होण्यासाठी- आत आणि बाहेर दोन्ही ठिकाणी वियोगोपलालन अनुभवून गोपी अखंड ब्रह्मानंदात निमग्न होतात.

(७१)

असे विरहाचे उपलालन सुरू झाले की भगवान् हृदयात पुनः प्रकट व्हावे म्हणून प्रत्येक गोपी काकुळतीस येते. ती प्रत्येक वृत्तीला सखीरूपाने पाहू लागते. प्रत्येकीला विनवणी करते. ''हे सखी मी हृदयरूपी कुंजवनात एकटी सांपडले आहे. भगवानही येथेच होता पण माझ्या अपराधामुळे मला सोडून निघून गेला तरी हे सखी, त्याला लवकर आण. मला भेटीव. मी कामबळाने त्या निर्विकाराच्या ठिकाणी विकार कल्पिला आहे खरा, पण तो मला एकदा का भेटला की मीही त्याच्यासारखीच निर्विकार होईन. तो माझ्या हृदयातच राहतो. पण मी एक अक्षम्य चूक केली -

मियां कंठी न घातली मिठी ।
मुख चुंबिता लपविली दृष्टी ॥

पण आता काय करावे ते काही कळत

(७२)

नाही. मी अनुतप्त झाली आहे. हे गुरुविश्वासवृत्तिरूपी सखये, मजवर अनुग्रह कर आणि त्या सांवळ्याला माझेकडे पुनः घेऊन ये.

असे हे हृदयातले गुप्त वियोग प्रेम- म्हणजे गुप्त विप्रलंभ उत्कटतेला पोचला की मग स्पष्ट विप्रलंभाची वार्ता दिसू लागते.

(१६) स्पष्ट विप्रलंभ : माधुर्यभक्ती

अन्तर्बाह्य सर्वत्र भगवंताचा वियोग अनुभवायला येणे म्हणजे स्पष्ट विप्रलंभ होय.

अन्तरी बाहेरी उमटे शोक ।
शोका पाटीपोटी व्रजनायक ॥

हृदयात जेव्हा भगवान् लपला तेव्हा गोपी घाबरी होऊन बाहेर पाहू लागली. परंतु बाहेरही भगवान् दिसेना तेव्हा मात्र विरहानलाने तिची अवस्था बेभान झाली. आत आणि बाहेर वियोगाने शोकाकुल होऊन व्याकुळ झाली. पण

(७३)

या शोकापूर्वी भगवंताचा संयोग होता व नंतर देखील संयोगच होणार; म्हणजे शोकाच्या पाठीपोटी व्रजनायक असल्यामुळे तिच्या अनुभवाला आतबाहेर सर्वत्र चेतन ब्रह्मच भासू लागले. सर्व जडभाव नाहीसा झाला. सर्व विश्वात तिला प्रियसखीच दिसूं लागल्या.

''वृत्तीने सखिमय अवघे देखिले''

जडचेतनाचा भेद संपुष्टात आला. गोपी म्हणते 'या साऱ्याजणी शांत दिसतात कारण त्यांना भगवंताचा संयोग असलाच पाहिजे. तेव्हा मात्र ती- 'मज न दिसे म्हणूनी कोपे ।।' अशा 'स-विरह प्रणय कोपाचेनि योगे' ती क्रुद्ध झाली तरी भगवंताच्या मीलनाच्या लोभामुळे तिने इतर सख्यांवर प्रेमच स्थापन केले.

ती पाषाणाला म्हणते- 'तूं भगवंताची सेवा केली म्हणून शांत आणि स्थिर दिसत

(७४)

आहेस. मीही तुझ्यासारखी मंदिराची पायरी होऊन सेवा करीन.'

'हे तुळशीमाते, तूं हरिसंगामुळे एवढी प्रफुल्लित दिसत आहेस. तूं मला साह्य कर म्हणजे मीही वृक्ष होऊन छाया देईन आणि कृष्णाला सुखी करीन.'

'हे मुरली, मी तुझा द्वेष आता मुळीच करणार नाही. तूं मला क्षमा कर. तूं मुकुंदाच्या मुखातील मधुर रस सारखा प्राशन करीत असतेस. म्हणूनच तुला समाधीतून व्युत्थान नाही. अखंड समाधीमुळे तूं जड दिसतेस. तूं भोगयोग्य नसूनही श्रीहरी तुझे नित्य चुंबन घेतो. कारण तुझ्या ठिकाणी निष्काम प्रेम भरले आहे. हे प्रिय सखी, मी तुझी सर्व सेवा करीन. तूं भगवंताच्या अधरासमीप गेलीस की आपल्या मधुस्नादाने माझी विरहदशा गोविंदाला सांग,

(७५)

ही एवढीच प्रार्थना !

पुढे तिच्या मनात निरनिराळ्या शंका कुशंका येतात. तिला वाटते- 'माझे हृदय विरहाने विदीर्ण झाले नाही हे बरे झाले; कारण हृदयाचा भंग झाला तर मी निर्गुणात मिळून जाईल आणि मग भगवंताला आलिंगन देता येणार नाही, असे समजूनच की काय माझे हृदय टिकून राहिले आहे.'

'मुक्तजनांनी तिरस्कार केला म्हणून अविद्या कंटाळली. माझ्या आश्रयाला आली आणि 'माझ्या आवडीची कृष्णमूर्ती उपजवो लागली.' असे असेल तर अविद्येला देखील मी मलिन म्हणणार नाही. माझे अत्यंत प्रिय करणारी तीही माझी सखीच आहे.'

'वियोगाने माझे हृदय कठीण झाले आहे म्हणून भगवान् येत नाहीत की काय? की

(७६)

माझ्यावर प्रसाद करण्याकरिताच अन्तःकरणात लपून बसले? हे काही कळत नाही.'

'पण मी जर शोकाचा रोध केला तर हृदय विदीर्ण होईल आणि हृदयातील नारायण बाहेर निघून जाईल.' म्हणून - **रडोन रडोन । हृदय रक्षी प्रियास्तव ॥८९॥**

गुरु-करुणा

अशा कारुण्यरसाच्या कल्लोळांमुळे विरहावस्था उत्कट होता होता ती बिचारी गोपी प्रेमताटस्थ्याने मौन होऊन जाते तेव्हा मात्र सद्गुरुमाउलीला कळवळा दाटून येतो आणि **गुरुकरुणाविश्वासवृत्ती'** हीच कोणी सखी होऊन निर्गुणात लपून बसलेल्या प्रभूच्या समीप जाते. आपल्या कन्येची व्यथित दशा त्याच्या कानावर घालते. आणि विरहाचे संकट दूर करण्यासाठी

(७७)

'गुरुकरुणाविश्वासवृत्ती भगवंताला म्हणते -

''ही गोपी प्रेमताटस्थामुळे निर्गुणात लीन झाली आहे. ती अद्वैतज्ञानसंपन्न आहे. पण सगुणपरमानंदासाठी दीन झाली आहे. हे श्रीकृष्णा, ती भक्तिसंपन्नही आहे असे तूं ओळख. ध्यानात तुला पाहताना, दुष्प्राप्य असूनही तूं मिळाला, असे जाणून ती आनंदभराने हसूं लागते. पण वृत्तींचा लय होऊन निर्गुण दिसू लागले की ती भयभीत होते. म्हणून -

तिया वृत्तीने धरावे सगुण ।
हाचि छंद धरून रडतसे ॥७७॥

आपल्या वृत्तीने तुझ्या सगुण रूपाकडे धावावे याच इच्छेमुळे ती गोपी व्याकूळ झाली आहे.

गोपीच्या अन्तःकरणात विरहाच्या अशा नानाविध वृत्ती उद्भवल्यामुळे शोक-भागीरथीचा प्रवाह मधुर-रस-कल्लोळाने उचंबळून तुझ्या

(७८)

चरणांवर अखंड समर्पण होत आहे. तिच्या शोकाच्या ऊर्मी कमी होताना दिसत नाहीत. हे भगवंता, तूं आता विलंब लावू नकोस. माझ्याबरोबर चल आणि तिला दृढ आलिंगन दे.' अशा गुरुकरुणाविश्वासवृत्तिरूपा सखीने भगवंताला आपल्या कन्येची विरहावस्था कथन केली तेव्हा कुठे भगवान् गोपीपुढे आविर्भूत झाले.

गुरुकृपेने भगवंताचा आविर्भाव झाला की स्पष्टवियोगभक्तिसंपन्न गोपीची एकेक वृत्ती भगवंतावर वेगवेगळी अर्पण होत नाही तर सर्वच्या सर्व वृत्ती युगपत्- म्हणजे एकदम भगवंताच्या चरणाला कवटाळतात आणि 'स्वामी, आता तरी आम्हाला पुनः सोडून जाऊ नका,' असे विनवू लागतात.

ऐसिया सखिवचने करून ।
सद्गुरुविश्वासवृत्तिसंगान । द्रुते चेतसि नारायण।

(७९)

आविर्भवे ॥१०२॥ तेव्हा विरहिणी वृत्ती । युगपत् चरणा झोंबती । आता स्वामिया पुढती । न टाकावे, म्हणती ऐसे॥१०३॥ [४३]

अन्तर्बाह्य वियोगाची प्रतीती आल्यानंतर भगवान् प्रकट होतात. तेही गोपीच्या मीलनात विरहदुःखरहित होतात. —परंतु गोपी मात्र संयोग झाल्यानंतरही 'भगवान् मला पुनः सोडून तर जाणार नाही' असे भय चित्तात सतत बाळगते. हीच संयोगातली वियोगवृत्ती आहे. हिला चित्तात दृढ ठसविले की सर्व प्रकारचे सोहंविकार भगवदर्पणहोऊ लागतात आणि वाचाऋण पूर्णपणे नाहीसे होते. प्रेमाची जाणीव- आनंदाची जाणीव- म्हणजे रसास्वाद देखील निःशेष नाहीसा होतो आणि केवळ निर्विकल्प प्रेमदशा राहते.

या सहजस्थितीत, समाधी असताना

(८०)

सर्व वृत्ती आत्मलीन असतात आणि व्युत्थान झाले तरी वियोगोपलालनाच्या उत्कट प्रेमात त्या वृत्ती 'असूनही' जाणल्या जात नाहीत, म्हणून गोपींची निर्विकल्प दशा कायमच राहते.

'अहं ब्रह्मास्मि' किंवा **'धन्योऽस्मि'** या ज्ञानाभिमानाचा म्हणजेच जाणीवेचा पूर्णपणे लोप होऊन एक प्रीतिवृत्तीच प्रधान होऊन जाते. म्हणजेच ज्ञानांश गौण होऊन आनंदाश प्रधान होतो.

तिट्कारोनि पळे ज्ञानाभिमान ।
बीभत्सरस जाण या नांव ॥[४४]
सच्चिदानंद भेदे । चालिली तिन्ही पदे ।
परी तिही उणी आनंदे । केली एके ॥ अमृ. ॥

सत्, चित् व आनंद यातील आनंदाचा अंश या पराभक्तीमुळे प्रधान होतो आणि सत् व चित् हे अंश गौण होतात. या वियोगोपलालनरूप

(८१)

परा भक्तीत **''वियोगाचे भय'' म्हणजे ''ज्ञानांश प्रधान होण्याचे भय, म्हणजेच आनंदाची जाणीव होण्याचे भय''** भक्ताला वाटते.

अन्तर्बाह्य भगवंताचा संयोग असूनही गोपींच्या प्रेमाचे समाधान होत नाही. अलंबुद्धी होत नाही किंवा प्रेमस्थितीची जाणीव म्हणजे ज्ञातता देखील येत नाही. तिच्या प्रेमाचा प्रवाह, खंडित न होता, सतत सगुण अनध्यस्तविवर्त भगवंताकडे वाहात राहतो. अशा प्रकारे नवेनवे भावनांचे उन्मेष भगवच्चरणावर अर्पण करणारी ज्ञानेश्वरकन्येची- गोपी पंचलतिकेची- उच्चतम संयोगेऽपि वियोगोपलालनरूपा माधुर्यभक्ती ती हीच होय.

समारोप

याप्रमाणे महाराजांनी भक्तीचे सोळा प्रकार केलेआहेत ते आपण पाहिले. हे सोळा

(८२)

प्रकार क्रमाक्रमाने श्रेष्ठ तर आहेत. परंतु एकदा कां भक्ताला पराभक्ती प्राप्त झाली की नंतर मात्र हे श्रेष्ठ-कनिष्टादी सर्व भेद लय पावतात.

गौणी आणि परा । या भेदासी नाही थारा ।
अवघीच एकाकारा । प्रेमलक्षणा ॥१२॥[४५]

पराभक्ती मिळेपर्यंत हे सारे प्रकार वाढत्या उत्कंठेने भक्तहृदयात उचंबळत असतात. पण एकदा अद्वैतज्ञानानंतर संयोगेऽपि वियोगोपलालनरूप प्रेम उत्पन्न झाले की मग मात्र तेच असीम प्रेम नाना भावांनी उचंबळून येते. त्यांत कोणताही क्रम नसतो. सर्व प्रकारचे विकार, सर्व भावना आत्यंतिक प्रेमाच्या उत्कट भावाने व्यक्त होऊन भगवंतावर 'तत्सुखसुखित्वा साठी' अर्पण होत असतात. गौणी, मध्यमा आणि परा असा त्या भक्तीच्या अभिव्यक्तीत भेद नसतो. परमप्रेमरूपा प्रेमलक्षणा पराभक्तीच एक

(८३)

शिल्लक असते. एखादे वेळी ती गौणी भक्ती आहे असे बाह्यतः वाटले तरी ती पराभक्तीच असते.

तेचि असीम मेळे। नाना भावभांति उगळे ।
क्रमावांचोनि येथींचे सोहळे ।
परी वाणी रूळे बोधार्थ क्रमी ॥६॥[४६]

हे सर्व प्रेमाचे प्रकार जोपर्यंत भक्त आत्मज्ञानसंपन्न होत नाहीत तोपर्यंत वेगवेगळे भासतात आणि त्यात एकापेक्षा एक श्रेष्ठ असा क्रम प्रतीत होतो. यातील श्रवणापासून सख्यत्वा-पर्यंतच्या गौणभक्तीला उपासना म्हटली जाते.

आत्मनिवेदन केले की भक्त भगवंताशी ऐक्य पावून समाधी साधतो. त्यानंतर जेव्हा समाधीतून तो पुनः व्युत्थित होतो तेव्हा 'अहंब्रह्मास्मि' या जाणीवेसहित वृत्ती स्फुरण पावते.

(८४)

आत्मनिवेदन ते ज्ञान । जेथ जाय अहंपण ।
तो अर्पिताही, आत्मा म्हणोन।
सोहंपण पुनः उठे ॥४६॥[४६]

हे जाणीवेचे वृत्तिस्फुरणच वाचाऋण किंवा अविद्यालेश होय. या सोहं-वृत्तीसह काम क्रोध लोभादी विकार उठत असतात. यालाच

सोहंकामविकार,
सोहंक्रोधविकार,
सोहंलोभविकार,

असे नवीन शब्द महाराजांनी योजिले आहेत. हे वाचाऋणासह उठणारे सर्व विकार भगवदर्पण झाले की त्यानंतर पराभक्ती प्राप्त होते. आणि एकदा पराभक्ती मिळाली की मग मात्र हे सर्व आनंदासाठी उठणाऱ्या वृत्तींचे- म्हणजे विकारांचे स्फुरण, ज्ञानाभिमानासह नसल्यामुळे, परमप्रेमाचेच ब्रह्मस्फुरण होऊन जाते.

(८५)

त्याचप्रमाणे भगवंताच्या लीलांचें श्रवण करणे, कीर्तन करणे वगैरे गौणी वाटणारे प्रकार उत्कट प्रेमामुळे पराभक्तीचेच नानाविध आविष्कार होतात. अन्तःकरणात दास्य, सख्य, वात्सल्य किंवा वियोगोपलालन यापैकी कोणतीही वृत्ती स्फुरण पावली तरी ती पराभक्तिरूपच असते.

पण अशा भक्ताची सहजावस्था माहीत नसेल तर 'तो भक्त अजून साधकावस्थेत आहे; त्याची गौणीभक्ती आहे, त्याच्या अभंगातील उद्‌गार साधक-दशेतील आहेत, असेच कोणालाही वाटेल परंतु असा विचार करणे म्हणजे त्या थोर आत्मज्ञानसंपन्न भक्तांवर E‹®ç® NÿÞ mÿY Òç®.(\ ì z<E çŒÒy Ä{Nÿe Äd ì y EçÒçzo > E ì z ì çÆmçÞ®ç È yo ì Nÿçº çª ª Òçº ç\ çÿ®ç NÿçÒy E§ÆçÆÎE n®çÿey

(८६)

साधकदशा व्यक्त होते, असे म्हणणारे महाभाग आहेत)

भक्ताच्या अन्तःकरणात उठणारी प्रत्येक वृत्ती सगुण भगवंतालाच आलंबन घेऊन उठत असते. आणि भगवंतालाच अर्पण होत असते. पराभक्ती मिळाल्यानंतर प्रेमातील उत्कटता कधीच कमी होत नाही. फक्त वृत्ती मात्र भिन्न भिन्न उठतात. पण त्यांतील उत्कटता, आत्मज्ञान, आत्मैक्य, वाचाऋणाचा नाश वगैरे सर्व जसेचे तसे कायम असतात. फक्त प्रेमाच्या वृत्ती एकविध न राहता अनेकविध असतात.

पराभक्तिरूप माधुर्यप्रेम मिळाल्यानंतर भक्ताने फक्त माधुर्यप्रेम केले पाहिजे, त्याने पूजा, अर्चा, सेवा करू नये किंवा लालन वात्सल्यादि त्याला निषिद्ध आहेत; असे मुळीच नाही.— ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री पतीची सेवा

(८७)

सर्व प्रकारे करते- ती पतीची दासी होते, त्याला मातृप्रेमाने जे वू-खावू घालते, मित्राप्रमाणे त्याच्याशी विचार-विनिमय करते, आणि एकांतात माधुर्यप्रेमही समर्पण करते. परंतु त्यामुळे तिची पतिपरता किंचितही उणी होत नाही. सदासर्वकाळ तिने माधुर्यप्रेमच पतीला दिले पाहिजे असे नाही. तर सर्व वृत्ती पतीवर उत्कट प्रेमाने अर्पण झाल्या म्हणजे झाले.

त्याचप्रमाणे भक्ताच्या अन्तःकरणातील प्रत्येक विकार, प्रत्येक वृत्ती उत्कटतेने सगुण भगवंतावर अर्पण होऊन भोक्तृत्व न स्फुरणे, रसास्वाद न येणे म्हणजेच **स्व-सुख-सुखित्व** न स्फुरतां - **तत्-सुख-सुखित्व** स्फुरणे. यानेच वियोगोपलालनरूप पराभक्ती कायम राहते. सोळा भक्तिप्रकारांची विविधता पराभक्तीतील नवनवीन उन्मेश होऊन जातात. त्यातील

(८८)

परमप्रेम समानच राहते. वृत्तींची नानाविधता असूनही उत्कट परमप्रेमहेच एकविध लक्षण कायम असते.

अशाप्रकारे श्रीकृष्णचंद्रमाच्या षोडश भक्तिकलांचे सविस्तर वर्णन करून श्रीगुलाबराव महाराजांनी भक्तिशास्त्रात महत्वाचे योगदान दिले आहे.

.....

*(टीप - **स्व-सुखसुखित्व** = आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति- स्वतःच्या सुखाने स्वतः सुखी होणे, हा **भोग.** /*
***तत्सुखसुखित्व** = त्याच्या सुखाने मी सुखी होणे, हे **प्रेम.** आणि निष्काम भक्तीत भोग नसून केवळ प्रेम असते हे विसरता कामा नये.)*

('तत्त्वमसि' या सामवेदीय महावाक्यातून भक्ती कशी मिळवावी याचा महाराजांनी मांडलेला भक्तिपदतीर्थामृतातील नवीन विचारही अभ्यसनीय आहे.)

(८९)

॥ भक्तीचे १६ प्रकार ॥

गौणी भक्ती / ज्ञानपूर्वउपासना

१) श्रवण - परीक्षित २) कीर्तन - नारदमुनी
३) स्मरण - प्रल्हाद ४) पादसेवन- लक्ष्मी
५) अर्चन - पृथू ६) वंदन - अक्रूर
७) दास्य - हनुमान ८) सख्य - अर्जुन

मध्यमा भक्ती : ज्ञानोत्तर

९) आत्मनिवेदन - ममतासमर्पण - बलिराजा
१०) आत्मनिवेदन - अहंतासमर्पण - बलिराजा
११) तस्यैवाहम् - लालन - तुकाराम
१२) ममैवासौ - वात्सल्य - यशोदा

परा भक्ती : संयोग / वियोग

१३) गुप्त संयोग १४) स्पष्ट संयोग
१५) गुप्त वियोग १६) स्पष्ट वियोग

---

(९०)

परिशिष्ट :-

सगुणसाकार अवतारविग्रहाचे

अनध्यस्त विवर्तत्व

''ज्ञानेकरून प्रीति-अनुसार वस्तूचे विशेष याथार्थ्य तो अनध्यस्तविवर्त म्हणावा.''

लक्षण

''अभिन्नसत्याऽपररूपत्वे सति,
भेद-अभानपूर्वकम्
अधिष्ठानज्ञान-अनावरकत्वे सति च
प्रीतिमात्रत्वाद्
अधिष्ठानज्ञानाऽनिवर्त्यम्
अनध्यस्तविवर्तलक्षणम्''॥[५१]

(निदिध्यासनप्रकाश अ.८)

(९१)

अनुवाद :-

१. अनध्यस्तविवर्त अधिष्ठानाशी **अभिन्नसत्ताक** असतो,
२. अधिष्ठानाहून **वेगळा** दिसतो,
३. अधिष्ठान व विग्रह यात **भेद नाही हे ज्ञान** कायम असते,
४. आत्यंतिक प्रेमानेअनुभूत होणारा अनध्यस्तविवर्तकेवळ **प्रीतिमात्र** असतो,
५. तो अधिष्ठानाच्या ज्ञानाने निवृत्त होत नाही.
६. याप्रमाणे अनध्यस्तविवर्ताचे लक्षण आहे.

समुद्र व त्यावरील लहरी किंवा सुवर्ण व अलंकार, ही अनध्यस्त विवर्ताची उदाहरणे आहेत. समुद्राचे ज्ञान झाले तरी लहरी नाहीशा होत नाहीत किंवा सोन्याचे झाले तरी अलंकार निवृत्त होत नाही. उलट अलंकार सोन्याचे आहे

(९२)

असे कळले तर अलंकारावरील अधिक प्रेम वाढते. म्हणजे अधिष्ठानाचे ज्ञान होऊनही त्यावर भासणारा विवर्त कायम राहतो, दोरीवरील सर्पाप्रमाणेनिवृत्त होत नाही.

उदा. - सोन्याचे अलंकार विकत घेताना त्यात सुवर्ण किती आहे तेच पाहतो. अलंकाराच्या सौंदर्याकडे त्याचे लक्ष नसते. परंतु ग्राहक मात्र अलंकाराच्या आवडीमुळे, अलंकाराच्या सुवर्णाबरोबर सौंदर्याची किंमतही देतो. त्याला सोनेही मिळते व त्याची आवडही पूर्ण होते.

ज्याप्रमाणे आकारविरहित सुवर्ण राहूं शकत नाही परंतु बुद्धीवृत्तीत मात्र निर्गुण निराकार सुवर्ण येऊ शकते. त्याप्रमाणे परब्रह्म हे निर्गुण निराकार आहे हे समाधीत अनुभवले जाते व व्युत्थानात मात्र उपपत्ती लावून

(९३)

नामरूपात तेच निर्गुण ब्रह्म भरले असे ज्ञान करून घेता येते म्हणजे निर्गुणाचा अनुभव नामरूपांचा व्यतिरेक करून घ्यावा लागतो. पण पुढे तेच ब्रह्म नामरूपातही ओतप्रोत भरले आहे असा अन्वयानुभव आल्यानंतर नामरूपेही ब्रह्मरूपच होतात.

निराकार सुवर्ण एकतर राहू शकत नाही, त्याला कोणता तरी आकार राहणारच मग आपली आपली आवड पूर्ण करून घेण्यास काय हरकत आहे? उलट त्यात सुख दुणावते. त्याचप्रमाणे व्युत्थानात नामरूपांचा प्रत्यय येणारच मग आपल्याला आवडणारी श्रीकृष्णादि रूपे घेऊन त्यांचाच सर्वत्र प्रत्यय घेण्यातच आनंद आहे. बरे, भगवंतांची अनेक रूपे असणे हे काही भगवंताचे दूषण नाही तर भूषणच आहे. अनेक रूपांतले भगवंताची लीलाकीर्ती

(९४)

वाढते. त्यात वाईट काय आहे?

योगशास्त्रातील लय योगाची साधना करताना सगुण भगवान अनध्यस्तविवर्त आहे, दिव्यदेहधारी आहे याचा प्रत्ययही येतो. म्हणून निराकार ब्रह्मापेक्षा सगुण भगवंताची भक्ताच्या आवडीनुसार लीलामय अनेक रूपे धारण करणे हे भगवंताला भूषण असून भक्ताचा निर्गुण ब्रह्मानंद दुणावणारे आहे.

द्वैत ते तंव दूण । अभेदासी ।।ज्ञाने.

अद्वैतं परमार्थो हि द्वैतं तद्भेद उच्यते ।।शंकराचार्य.

.....



(९५)

श्रीगुलाबरावमहाराजांचे योगदान

*

धर्माचे मूलतत्व

सत्ववृद्धिर्भवेद् येन अन्य गुणद्वयघातिनी ।।
स हि धर्मो न चान्यःस्यादिति स्वमतनिर्णयः।।

(यष्टी - १६)

*

समन्वयव्याख्या

१. एकाधिकरणक-
२. भिन्नवृत्तित्वे सति
३. संप्रदायविच्छेदरहितत्वे सति च
४. पूर्वनिकफलावष्टम्भानन्तरम्
५. एकफलजनकत्वम् - समन्वयलक्षणम् ।।

(य.७-पत्र२२)

*

(९६)

श्रीगुलाबरावमहाराज : ग्रंथसूचि

(यष्टि १) रु. ४०
(यष्टी २) पूर्वार्ध रु.४०
(") उत्तरार्ध रु.५०
(य.३)प्रियलीलामहोत्सव रु.८०
(य.४) स्त्रीगीत संग्रह रु.४०
(य.५) अलौ.व्याख्याने रु.५०
(य.६)स्वमन्तव्यांश०हिं. रु.५०
(य.७) ३८ पत्रे रु.६०
(य.८) साधुबोध रु.६०
(य.९)अभंगांची गाथा रु.१००
(") पदांची गाथा रु.१००
(य.१०) प्रेमनिकुंज रु. ७५
(य.११) संप्रदायसुरतरु
पूर्वविहार रु.१२०
उत्तरविहार रु.१२०
(य.१२) पत्रे ४६ रु.६०
(य.१३) वेदान्त०दीपिकारु.५०
(य.१४)भक्ति.-सांख्य० रु.८०
(य.१५)आत्मचरित्रादि रु.१२०
(य.१६)संस्कृत ३१रचनारु.१२०
(य.१७)सुबोध हिंदुधर्म रु.८०
(य.१८)स्फुटनिरूपणे रु.५०
(य.१९)हिंदी गीता रु.५०
(य.२०)योगप्रभाव गद्य रु.१२०

.....

'श्रीमहाराजांचे चरित्र' त्रिपुरवारकृत (मूळ) रु.१५०
'माधुर्यमधुकोश' महाराजांच्या ग्रंथांतील विषयसूचि रु.३००
१३० ग्रंथांचा सारांश (११४ पत्रांसह) रु.२०

श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,दहीसाथ,अमरावती

सर्वस्पर्शी प्रज्ञा

१ वेद-मीमांसक, वेद-दृष्टे व वेद-श्रोते
२ सूत्रकार ऋषी : ९ सूत्रग्रंथ
३ भाष्यकार आचार्य
४ भक्त्याचार्य : भक्तिशास्त्राचे निर्माते
५ ज्ञानेश्वरमधुराद्वैत दर्शनाचे निर्माते
६ धर्माचार्य : धर्माचे सर्वांगीण स्वरूप दाखविणारे
७ पुराणाचार्य : समन्वयदृष्टीने सूत्ररचना
८ सांख्यदर्शनाचार्य : ६ ग्रंथ
९ योगदर्शनाचार्य : १० ग्रंथ
१० न्यायदर्शनाचार्य : ग्रंथ
११ पूर्वमीमांसाचार्य : संकल्पना स्पष्टीकरण
१२ आयुर्वेदाचार्य : ८ ग्रंथ
१३ संगीताचार्य : ग्रंथलेखन
१४ नवीन वृत्तरचनाकार
१५ छंदरचनाकार
१६ विविध विषयावरील ग्रंथकार
१७ कीर्तनकार : १८ आख्यानरचना
१८ लोकगीतकार : तुंबडी,सयनाजी,स्त्रीगीते वगैरे
१९ लावणीकार
२० नाटककार
२१ आत्मचरित्रकार

.....श्री गुलाबरावमहाराज : भक्ति-विचार.....

कव्हर
पान ४

२२ समन्वयमहर्षी : *धर्मसमन्वय-दर्शनसमन्वय-शास्त्रसमन्वय-नीतिसमन्वय पाश्चात्य- भारतीय : तुलना व समन्वय*
२३ काव्यशास्त्रनिर्माते
२४ नवीन भाषानिर्माते - नावंग भाषा
२५ नावंग भाषेचे व्याकरणनिर्माते
२६ नवीन लिपी निर्माते
२७ क्रीडा निर्माते : (परमार्थ-प्रक्रियात्मक मोक्षपट)
२८ विज्ञानाला नवी दृष्टी देणारे
२९ मानसशास्त्राला नवी दृष्टी देणारे
३० इतिहासाला नवी दृष्टी देणारे
३१ चमत्कारांचा निषेध करणारे
३२ नीतिशास्त्रज्ञ : पाश्चात्य व भारतीय
३३ कवी व गायक
३४ लोक-शिक्षक
३५ स्त्री-शिक्षक
३६ बाल-शिक्षक
३७ अभंग - २१५२ / पदे - २२४४ पैकी **(संस्कृत ४१)**
३८ श्लोक - १००० **(संस्कृत-मराठी)**
३९ ओव्या - २३००० हून अधिक
४० गद्यपद्य पत्रे ११८ - **(संस्कृत ११)**
४१ ग्रंथ १३९ (संस्कृत-मराठी-वऱ्हाडी-हिंदी-व्रजभाषेतून)
हिंदी- ३ / संस्कृत-३१
(पृष्ठे- ७०००)

.....श्री गुलाबरावमहाराज : भक्ति-विचार.....

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.